पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/१२/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१८/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.पाडाळे निता विलास
३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
४. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.कुटे चारुशीला प्रभाकर

मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) वाकड थेरगाव रस्त्यावरील मधुबन हॉटेलपासुन मारुंजीकडे विनोदेवस्ती मार्गे जाणारा २४ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे, या कामातून हरीझोन सोसायटीपासून काळया खडकाकडे जाणा-या रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास मंजुरी मिळणेबाबत - मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) प्रभाग क्र. ५२ मध्ये रस्त्यावरील खड्डयांची बीबीएम व हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे. या कामास र.रु. ५०,००,०००/- ची प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत- मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र. ५२ येथील रस्त्यावरील चर खड्डयांची खडीमुरुमाने व बीबीएम पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे. या कामास र.रु. ५०,००,०००/- ची प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत- मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०४/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : २५ विषय क्रमांक : १

दिनांक : १८/१२/२०१५

सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.निता पाडाळे

संदर्भ : मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

वाकड येथील हरीझोन सोसायटीपासून काळया खडकाकडे जाणा-या रस्त्यावर सध्यस्थितीत अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने व रस्त्याची रुंदी खुपच कमी असल्यामुळे येथील नागरिकांची गैरसोय होत आहे. सदर रस्त्यावर नागरिकांची मोठया प्रमाणात वर्दळ चालू असते. सदर नागरिकांच्या वाहतुकीच्या सोयीच्या दृष्टीने या रस्त्याचे डांबरीकरणाचे व रुंदीकरणाचे काम पुर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत सदर ठिकाणचे स्थानिक नगरसदस्य व नागरिकांचे मनपाच्या वेब पोर्टल सारथी हेल्प लाईन वर रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत वारंवार तक्रारी येत आहेत.

तरी वाकड थेरगाव रस्त्यावरील मधुबन हॉटेलपासुन मारुंजीकडे विनोदेवस्ती मार्गे जाणारा २४ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणे या कामात बचत असल्याने सदर कामातून हरीझोन सोसायटीपासून काळया खडकाकडे जाणा-या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २६ विषय क्रमांक : २

दिनांक : १८/१२/२०१५

सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.निता पाडाळे

संदर्भ : मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक-३ सन २०१५-२०१६ मध्ये पान क्र. ६३०, अ.क्र.१७ वरती प्रभाग क्र. ५२ मध्ये रस्त्यावरील खड्डयांची बीबीएम व हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे काम आहे प्रभाग क्र. ५२ मधील रस्ते केबल खोदाईमुळे तसेच नव्याने जल:निसारण व पाणीपुरवठा विभागाने जलवाहिन्या टाकल्यामुळे रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे सदर कामास र.रु. ३०,००,०००/- इतकी रक्कम कमी पडत असल्याने वाढीव कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे सदर कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,०००/- यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १८/१२/२०१५

सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.निता पाडाळे

संदर्भ : मा.गोरक्ष लोखंडे व मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक-३ सन २०१५-२०१६ मध्ये पान क्र. ६३०, अ.क्र.१८ वरती प्रभाग क्र. ५२ येथील रस्त्यावरील चर खड्डयांची खडीमुरुमाने व बी.बी.एम. पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे काम आहे प्रभाग क्र. ५२ मधील रस्ते केबल खोदाईमुळे तसेच नव्याने जल:निसारण व पाणीपुरवठा विभागाने जलवाहिन्या टाकल्यामुळे रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे सदर कामास र.रु. ३०,००,०००/- इतकी रक्कम कमी पडत असल्याने वाढीव कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे सदर कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,०००/- यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **नंदा विकास ताकवणे** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८३५ /२०१५
दिनांक : १८/१२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-15-16\proceeding 7_Vidhi.doc